Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-IV APR. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Vol - IV Issue-IV APRIL 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# पर्यावरणवाद

**लक्ष्मण वैजनाथ साके**
महात्मा फुले नूतन महाविद्यालय,
मिरजगाव, ता. कर्जत, जि.अ.नगर

## प्रस्तावना :-

पर्यावरण संरक्षणासाठी जगाच्या विविध भागात निर्माण झालेली एक बौध्दिक व सैध्दांतिक चळवळ म्हणजे पर्यावरणवाद होय. पर्यावरणीय प्रश्नांबाबत जागरुकता निर्माण करणे तसेच जागतिक पातळीवर पर्यावरणीय सहकार्य निर्माण करणे ही पर्यावरणाची तात्विक भूमिका आहे. त्यासाठी प्रसंगी पर्यावरण संरक्षणासंदर्भात लढा देखील दिला जातो. जगात विविध पर्यावरणीय सिध्दांत प्रचलित झाले आहेत. या सर्वांचा एकत्रित उल्लेख करताना पर्यावरणवाद ही संकल्पना वापरली जाते.

## पर्यावरणाचे स्वरुप :-

पर्यावरणवाद हा एक आधुनिक स्वरुपाचा विचार प्रवाह आहे, कारण पर्यावरणीय प्रश्नांबाबत आजच्या काळात जी संवेदनशीलता निर्माण झालेली दिसते. ती पूर्वीच्या काळात नव्हती. विकास प्रक्रियेत पर्यावरणाकडे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष झाले. त्यामुळे पर्यावरणीय प्रश्नांनी उग्र रुप धारण केले म्हणून आधुनिक काळात पर्यावरणीय प्रश्नांची दखल घेतली जावू लागली व पर्यावरणवाद ही विचारप्रणाली समोर आली.

पर्यावरणवाद ही एक व्यापक स्वरुपाची विचारप्रणाली आहे. कारण पर्यावरणीय समस्यांची तीव्रता केवळ एका विशिष्ट राष्ट्रापुरती मर्यादित नसते तर सर्व राष्ट्रांना पर्यावरणीय समस्यांचे दुष्परिणाम सहन करावे लागतात. एका देशात घडणा-या पर्यावरण विरोधी कृती या आसपासच्या देशांना देखील पर्यावरणीय संकट निर्माण करणा-या ठरतात. अशा परिस्थितीत सर्वत्र पर्यावरणवादास मान्यता प्राप्त झाली आहे.

पर्यावरणवाद ही एक संमिश्र स्वरुपाची विचारप्रणाली आहे. कारण पर्यावरणवादात पर्यावरण संरक्षणासंदर्भात केल्या जाणा-या सर्व प्रयत्नांचा समावेश होतो. हरित सिध्दांत, जैव सिध्दांत, परि - जैवसंस्था यासारखे विविध विचार प्रवाह पर्यावरणवादांतर्गत निर्माण झालेले आहे. त्यांची भूमिका देखील वेगवेगळी आहे. त्यामुळे पर्यावरणवादास संमिश्र स्वरुप प्राप्त झाले.

पर्यावरणवादाचे स्वरुप विविधांगी किंवा बहुआयामी आहे. कारण प्रत्येक देशाने पर्यावरण संरक्षणासाठी वेगवेगळ्या उपाययोजनांचा अवलंब केलेला दिसतो तसेच सर्वच ठिकाणी पर्यावरण चळवळींचा प्रभाव सारखा नाही. बिगर शासकीय संस्थांचे कार्य देखील जगात विविध ठिकाणी विखुरलेले आहे. मात्र, पर्यावरण संरक्षण हा मुद्दा समान स्वरुपाचा असलेला दिसतो.

## जागतिक पातळीवरील पर्यावरणीय समस्या :-

आंतरराष्ट्रीय राजकारणात पर्यावरणविषयक जे प्रश्न निर्माण झाले त्यांचे वर्गीकरण दोन गटात केले जाते.

१) जागतिक सामाजिक संपत्तीविषयीचा प्रश्न व २) पर्यावरणाचा -हास किंवा प्रदूषणाचा प्रश्न.

जे प्रश्न जागतिक सामाजिक संपत्तीच्या बाबतीत निर्माण होतात त्यांची उकल करण्यासाठी आंतरराष्ट्रीय करार केले जातात. मात्र दुस-या प्रकारात प्रदूषण रोखण्यासाठी विविध करार केले जातात. या करारांमध्ये प्रत्येक देशातील उद्योगधंद्यांमध्ये शेतीमध्ये ज्या प्रकारच्या कृतीमुळे हानी पोहोचेल त्यावर निर्बंध घातलेले असतात. विशिष्ट रसायने, कीटकनाशकांचा वापर, जंगलतोड, काही प्रकारची प्रदूषके हवा किंवा पाणी तसेच जमिनीवर सोडणे यावर प्रतिबंध घातले जातात. या प्रतिबंधाची व्याप्ती वातावरण, जैविक विविधता, जंगले व समुद्र, नैसर्गिक संपत्ती, उर्जास्त्रोत यांच्या प्रदूषणाशी निगडित असते. आंतरराष्ट्रीय राजकारणातील पर्यावरणाचा प्रश्न पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल :

### १) वातावरणासंबंधीचा प्रश्न :

वातावरणाशी संबंधित खालील दोन समस्या आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून महत्वाच्या आहेत. अ) जागतिक तापमानात वाढ ब) ओझोन वायूचा थर विरळ होणे.

जागतिक तापमानात मोठ्या प्रमाणावर बदल झालेला आहे. गेल्या काही दशकांचा विचार केला तर असे नजरेस येते की जागतिक वातावरणात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झालेले आहे. आंतरराष्ट्रीय राजकीय संबंधाचा सैध्दान्तिक अभ्यास करणाऱ्या विविध शास्त्रज्ञांना 'तापमानात होणारी वाढ' हा गंभीर प्रश्न आहे असे जाणवू लागलेले आहे, कारण तापमानात झालेल्या वाढीमुळे आर्टिक्ट व अंटार्टिका या प्रदेशांवरील बर्फ मोठ्या प्रमाणावर वितळण्यास सुरुवात झालेली आहे. यामुळे शास्त्रज्ञ अशी भीती व्यक्त करतात की जगातील महासागरांच्या पाण्याच्या पातळीत वाढ होईल तसेच या खंडातील समुद्र किना-याजवळील गावे पाण्याखाली बुडून नष्ट होतील. अनेक भागातील हवामानात लक्षणीय बदल दिसेल काही ठिकाणी याचे फायदे दिसून आले, तरी बहुतेक ठिकाणी याचे दुष्परिणाम आढळतील व नैसर्गिक पर्यावरण व्यवस्थेचा नाश होईल व शेती धोक्यात येईल. तसेच कार्बन डाय ऑक्साईड व प्रदूषण करणारे इतर वायू औद्योगिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर वातावरणात सोडले जातात. ते देखील जागतिक तापमान वाढीला कारणीभूत ठरतात असे मत शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे. तेल, कोळसा व नैसर्गिक वायू यांचा औद्योगिक क्षेत्रात जो वापर होतो त्यामुळे कार्बन डायऑक्साईड सारखे घातक वायू हवेत सोडले जातात. हे वायू वातावरणात साठतात व सूर्यकिरणांमुळे निर्माण झालेली उष्णता वातावरणाबाहेर फेकली जाऊ न देता अडवितात, त्यामुळे एकंदरीत तापमानात वाढ होते. यालाच 'ग्रीनहाऊस गॅसेस' असे म्हणतात. थोडक्यात, जागतिक तापमानात होणारी वाढ ही एक आंतरराष्ट्रीय समस्या बनलेली आहे, असे मत विविध शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे.

वातावरणाच्या संदर्भात निर्माण झालेला हा एक महत्वाचा प्रश्न असून जगातील विविध देशांतील शासनांनी या संदर्भात चर्चा केलेली आहे. औद्योगिकीकरणामुळे काही विशिष्ट रसायने हवेत सोडली जातात. ही रसायने तरंगत वातावरणाच्या वरच्या स्तरात पोहोचतात. वातावरणाच्या स्तरावर असलेल्या ओझोन वायूवर या रसायनांचा विपरीत परिणाम होतो व या वायूचे प्रमाण कमी होते. सुगंधी द्रव्यांच्या फवारणीमध्ये वापरले जाणारे क्लोरो फ्ल्युरोकार्बन (CFCs) हे घटकद्रव्य कारणीभुत असते असे लक्षात आले. १९९० च्या कालावधीत क्लोरो फ्ल्युरोकार्बनमुळे ओझोनच्या थरावर विपरीत परिणाम होत आहे याबद्दल शास्त्रज्ञात एकमत झाले.

ओझोन वायुचा थर विरळ झाल्याने ज्या समस्या निर्माण झाल्या त्या एकपरीने सामायिक स्वरुपाच्या आहेत असे समजले जाते. विकसीत देशांनी जर क्लोरो फ्ल्युरोकार्बन वापरण्यावर बंदी आणली तर बंदी न घालणा-या देशांना आर्थिक फायदा होऊ शकतो. पण CFCs वापरण्याचे सामयिक नुकसान ही सर्वांना समजून येण्यासारखी बाब आहे. १९८७ साली मॉंट्रियल करारानुसार २१ देशांनी १९९८ पर्यंत CFCs चा वापर ५० % पेक्षा कमी करण्याचे मान्य केले होते, परंतु १९९० साली या करारात बदल केला व जगातील ८१ राष्ट्रांनी २००० सालापर्यंत क्लोरो फ्ल्युरोकार्बनचा वापर पूर्णपणे थांबविण्याचे ठरविले. म्हणजेच ओझोन वायूचे प्रमाण कमी होणे हा एक सामायिक प्रश्न मानला जावा असेच मत विविध शास्त्रज्ञांनी व्यक्त केललेआहे.

### २) जैविक विविधता :-

जैविक विविधता म्हणजे पृथ्वीवरील वनस्पती व प्राण्यांच्या प्रजातीचे वैविध्य होय. ज्या प्रजातीमुळे पृथ्वीवरील पर्यावरणीय व्यवस्था तयार होतात अशा लाखो प्रजाती अस्तित्वात आहेत. काही प्रजाती पृथ्वीवरील विविध ठिकाणी आढळून येतात, तर काही विशिष्ट ठिकाणीच आढळतात. मानवाने जो पर्यावरणाचा नाश केला त्यामुळे असंख्या प्रजाती अगोदरच नष्ट झालेल्या आहेत. तसेच काही प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. प्राणी व वनस्पती यांच्या नाशाला अनेक कारणे आहेत. अतिप्रमाणात शिकार, मासेमारी अगोदर अस्तित्वात असलेल्या प्रजातींमध्ये वेगळ्याच प्रजाती आणून सोडणे, अनेक ठिकाणी प्रजातींची विशिष्ट आश्रयस्थाने नष्ट होणे अशी अनेक कारणे आहेत.

### ३) जंगले व महासागर :-

विषुववृत्तीय पर्जन्यवने आणि महासागर हे जैविक वैविध्य व वातावरण या दोन्हींसाठी महत्वाचे आहेत. लाकूड व मासे यासारखे किंमती साधनसंपत्तीचा मोठा साठा यात असल्याने त्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वाचे स्थान आहे. मात्र या दोन्ही साठ्यात वैविध्य आहे. वने एखाद्या राष्ट्राच्या भूभागात मोठ्या प्रमाणावर असतात तर महासागर हे सामायिक साधनसंपत्तीचाच भाग

असतात. घनदाट पर्जन्यवनांमुळे वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण कमी होते व जागतिक तापमानात होणारी वाढ रोखली जाते. अशा वनांची जोपासना व्हावी यासाठी श्रीमंत राष्ट्रे गरीब राष्ट्रांना आर्थिक मदत देतात.

### ४) प्रदूषण :-

प्रदूषणाचा प्रश्न ब-याच वेळा राज्याच्या कार्यकक्षेतील प्रश्न म्हणून हाताळला जातो. कारण प्रदूषणाची व्याप्ती व परिणाम बऱ्याचदा मर्यादित प्रमाणात असतात. १९८६ साली जेव्हा भोपाळमध्ये युनियन कार्बाईड या कंपनीतून बायूगळती झाली त्याचे परिणाम भोपाळ व आसपासच्या परिसरातच दिसून आले. मात्र, सागरात ढकलला जाणारा कचरा व त्यामुळे होणारे प्रदूषण हा याला अपवाद आहे. प्रदूषण जरी राज्याच्या सीमा ओलांडत असले तरी तो जागतिक सामायिक प्रश्न म्हणून गणला जात नाही.

### ५) नैसर्गिक साधनसंपत्ती :-

नैसर्गिक साधनसंपत्ती हा पर्यावरणाचा एक भाग आहे. त्यामुळे या साधनसंपत्तीचे रक्षण करणे महत्वपूर्ण मानलेले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीत खनिजे, कोळसा, तेलवायू यासारख्या घटकांचा समावेश होतो. खनिज संपत्ती जर देशांतर्गत असली तर त्याचे उत्खनन करुन वापर करण्याचा अधिकार संबंधित देशाला आहे. मात्र, अशी संपत्ती नेमकी कोणाच्या मालकीची आहे यावरुन आंतरराष्ट्रीय पातळीवर संघर्ष उद्‌भवितात, परंतु नैसर्गिक साधनसंपत्ती ही देशांतर्गत असल्याने ती सामायिक संपत्तीचा भाग नसतो. मात्र अशी साधनसंपत्ती जगातील सर्व देशात सारख्या प्रमाणात नसल्याने विविध देशात यांच्या मालकीवरुन विविध संघर्ष उद्‌भवितात.

### ६) पाणी :-

पाणी हे पिण्यासाठी, शेतीसाठी व उद्योगांच्या विकासासाठी आवश्यक आहे. औद्योगिकरणामुळे पाण्याच्या वापराचे प्रमाण देखील वाढलेले आहे. मात्र, पाण्याचा पुरवठा हा मर्यादित असल्याने तसेच पाण्याचे साठे हे आंतरराष्ट्रीय सीमांचे उल्लंघन करीत असल्यामुळे पाण्यावरुन जगभरात संघर्ष निर्माण होतात. यात नद्यांच्या पाण्याचे वाटप, धरणे, कालवे यांच्या पाण्याचे वाटप हे देशादेशांतील वादाचे मुद्दे बनलेले आहेत. उदा. भारत - पाकिस्तान, भारत बांग्लादेश.

### पर्यावरणीय समस्यांची सोडवणूक :-

गेल्या दोन ते तीन दशकात जागतिक पर्यावरणाचा प्रश्न अतिशय गंभीर बनत चाललेला आहे. १९७० च्या दशकात पर्यावरणविषयक चिंतित असलेल्या जगभरातील कार्यकर्त्यांनी वसुंधरा दिवस साजरा केला. १९७० च्या दशकाच्या पूर्वार्धात सुरु झालेल्या ऊर्जेच्या संकटामुळे विशेषत: मोठया प्रमाणावर औद्योगीकीकरण झालेल्या जगतात पर्यावरणाचा प्रश्न गांभीयाने चर्चिला गेला. पर्यावरणामुळे निर्माण झालेल्या समस्या व त्याचे समाजावर झालेले विपरीत परिणाम टाळण्याच्या उद्देशाने झालेल्या परिषदा व त्यांची फलश्रुती पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येईल:

### १) क्लब ऑफ रोम रिपोर्ट :-

१९६० च्या दशकात कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे होणा-या पर्यावरणीय हानीबाबत जनजागृती सुरु झाली. रॅशेल कार्सन यांच्या सायलेंट स्प्रिंग या पुस्तकाने D.D.T. व तत्सम कीटकनाशकांबद्दल माहिती प्रसिध्द झाल्यानंतर आधुनिक पर्यावरणीय चळवळींना सुरुवात झाली. रोममध्ये जागतिक पर्यावरणाच्या प्रश्नावर परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत मानवी जीवन सुखावह होण्यासाठी विकासाची आत्यंतिक गरज आहे हे तत्वत: मान्य करण्यात आलेले असले तरी विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची होणारी हानी टाळण्यासाठी प्रत्येक राष्ट्राने प्रयत्न करणे गरजेचे आहे असा ठराव मंजूर करण्यात आला.

### २) स्टॉकहोम परिषद :-

पर्यावरणविषयक ज्या नवीन जाणिवा निर्माण झाल्या होत्या त्याचेच फलित म्हणून १९७२ साली स्वीडनची राजधानी स्टॉकहोम येथे पर्यावरणविषयक परिषद आयोजित करण्यात आली होती.

या परिषदेचे उद्दिष्ट प्रदूषण आणि पर्यावरणाच्या समस्या सोडविण्यासाठी एक पध्दतशीर चौकट तयार करणे हे होते. या परिषदेने आंतरराष्ट्रीय पर्यावरणाच्या प्रश्नाला नवी दिशा दिली. या परिषदेत जी तत्वे मान्य करण्यात आली व ज्या संस्था निर्माण करण्यात आल्या व जे कार्यक्रम सुरु करण्यात आले त्यांचा होणारा परिणाम दीर्घकालीन स्वरुपाचा होणारा होता.

**३) १९९२ ची रिओ परिषद :-**

ब्राझील येथे भरविलेल्या या परिषदेचा मुख्य अभ्यासविषय हा 'शाश्वत आर्थिक विकास' होता. शाश्वत आर्थिक विकासाची चाकोरीबध्द अशी व्याख्या करता येत नाही मात्र याचा अर्थ असा आर्थिक विकास की, ज्यामुळे पर्यावरणीय साधनसंपत्तीचा -हास झाला तर आज जो काही आर्थिक विकास अनुभवायला मिळतो आहे त्याची फळे मिळणार नाहीत. म्हणजेच आर्थिक विकास हा ख-याख-या अर्थाने अनुभवायचा असेल तर पर्यावरणाचे संरक्षण करण्याची नितांत आवश्यकता आहे व हे कार्य कोणत्याही एका राष्ट्राचे नाही तर त्यासाठी सामुहिक प्रयत्न झाले पाहिजेत, असे आग्रही प्रतिपादन या परिषदेत केले गेले.

**४) २००२ ची जोहान्सबर्ग परिषद :-**

१९७२ ची स्टॉकहोम परिषद व १९९२ ची रिओ परिषद पर्यावरणीय प्रश्नाला चालना देणारी सिध्द झालेली असली तर विकसित राष्ट्रांनी औद्योगिकीरणाच्या विकासावर अधिक भर दिलेला होता. विकसित देशांनी आपल्या देशापुरतेच पर्यावरण संरक्षण कार्यक्रम आखले होते. आपल्या राष्ट्रातील टाकाऊ वस्तु विकसनशील देशात पाठविण्याचे धोरण आखले. उदा. इटलीतील घनकचरा मोठया प्रमाणावर नायजेरिया, युगांडा, रवांडा या आफ्रिकन राष्ट्रात पाठविला होता. विकसनशील राष्ट्रे स्वतःच्याच फायद्याचा अधिक विचार करीत आहेत ही बाब ध्यानात घेऊन पर्यावरणाचे संवर्धन करण्याच्या जोहान्सबर्ग येथे २००२ साली जोहान्सबर्ग परिषद आयोजित करण्यात आली.

**संदर्भ :-**

१) आंतरराष्ट्रीय राजकारण :- प्रा. डॉ. विलास आवारी, प्रा. विरेंद्र शंकर घनशेट्टी, प्रा. शिवाजीराव गायकवाड, प्रा. ज्ञानोबा ढगे
२) भूगोल :- डॉ. श्रीकांत कार्लेकर, प्रा. भागवत
३) भारत आणि जग :- प्रा. डॉ. तोडकर
४) भूगोल शब्दकोष :- प्रा. जॉन्सन बोर्जेस
५) भूरचा शास्त्राचे घटक :- डॉ. आशोक देवकर, प्रा. गोडसे